Rankranti Multidisciplinary Research Journal ISSN 2454-8731

# कोरोना नियंत्रणार्थ झालेल्या टाळेबंदीच्या आर्थिक परिणामांचे विश्लेषण

डॉ. कल्पना भजनी
कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर
डॉ. कांचनमाला क्षीरसागर
एल. ए. डी. कॉलेज, नागपूर

सारांश :

कोरोनापूर्वी आपल्या देशाची अर्थव्यवस्था मागील ५ वर्षापासून निरंतर ढासळत आहे. त्यातल्यात्यात या कोरोना महामारीमुळे शहरात एकीकडे शुकशुकाट झालेला असतांना दुसरीकडे त्याचे वेगवेगळया घटकांवर विपरीत परिणाम झाल्याचे चित्रही दिसून येत आहे. त्यामुळे सध्याच्या हया आर्थिक परिस्थितीमुळे अनेक प्रकारच्या संकटाना तोंड दयावे लागत आहे. हेच चित्र कायम राहिले तर अत्यंत बिकट परिस्थिती निर्माण होणार आणि लोक कोरोनापेक्षा उपासमारीने व आत्महत्येने अधिक मरणार! इतके हे भयावह आहे. याच काळात अनियोजित टाळेबंदीमुळे सर्व व्यवहार स्थिरावले आहे. अनेक प्रकारचे उद्योग, व्यवसाय, शेती, बँक, शैक्षणिक संस्था, पर्यटन संस्था, शेअर मार्केट, स्वयं रोजगार, नौकरदार वर्ग, मजूर वर्ग यांच्यावर दुष्परिणाम झालेले प्रत्ययास येते. थोडक्यात सांगायचे झाल्यास सध्याची अर्थव्यवस्था दुष्टचक्रामध्ये सापडलेली आहे. अशा परिस्थितीत सामाजिक सुरक्षिततेबरोबरच लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याची गरज आहे. यासाठी शासनाला व विविध सामाजिक संस्थांना समोर येऊन स्थानिक पातळीवर प्रयत्न करावे लागतील. कारण लोकांची मागणी निर्माण होणे गरजेचे आहे. मागणी वाढल्यास उत्पादन, रोजगार वाढून अर्थव्यवस्था पुनः संचालित होऊ शकेल.

बीजशब्द :— कोरोना, टाळेबंदी, आर्थिक परिणाम, अर्थव्यवस्था

उद्दिष्टये :—

1. टाळेबंदीमुळे रोजगारीवर झालेल्या परिणामांचे अध्ययन करणे.
2. टाळेबंदीमुळे अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रावर झालेल्या परिणामांचे अध्ययन करणे.

गृहीत :—

1. टाळेबंदीमुळे अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रावर व क्षेत्राअंतर्गत रोजगारीवर परिणाम झालेला दिसून येतो.

संशोधन पद्धती :—

प्रस्तूत संशोधन पद्धती दुय्यम समंकावर आधारीत आहे. याअंतर्गत कोरोना व टाळेबंदीचा अर्थव्यवस्थेवर झालेल्या परिणामाशी संबंधित विविध